आजी सैनिकांच्या पत्नींच्या
आंतरजिल्हा बदलीकरिता.

**महाराष्ट्र शासन**
**ग्राम विकास विभाग**
शासन पूरकपत्र क्रमांक. आंजिब- ४९१९/प्र.क्र.२१९/आस्था-१४
२५ मर्झबान पथ, बांधकाम भवन, फोर्ट,
मुंबई ४०० ००१
दिनांक : १५ जुन, २०१९

**वाचा :**

१) शासन निर्णय क्रमांक आंजिब४९१ -७.क्र.प्र/७९१४-आस्था/, दिनांक २४ एप्रिल, .२०१७
२) शासन निर्णय क्रमांक आंजिब/४९१९ -प्र१४-आस्था/२१९.क्र., दिनांक ८ मार्च, २०१९.

**प्रस्तावना :-**

देशाच्या सेवेत असलेल्या सैनिकांच्या पत्नी शिक्षीका म्हणून राज्यातील जिल्हा परिषदांमध्ये कार्यरत आहेत. त्यांच्या बदल्या थेटपणे त्यांच्या पतीच्या मुळ जिल्हा परिषदेमध्ये बदली करण्याचा शासनाने निर्णय घेतला. व त्यानुसार संदर्भ क्र. २ वरील दि. ८ मार्च, २०१९ च्या शासन निर्णयान्वये त्यांच्या आंतरजिल्हा बदल्या करण्यात आल्या. संबंधित शिक्षकांच्या नावांची यादी या दि. ८ मार्च, २०१९ च्या शासन निर्णयासोबत निर्गमित करण्यात आलेली आहे.

माञ, तद्नंतर काही आजी सैनिकांच्या पती ज्या शिक्षीका म्हणून कार्यरत आहेत, त्यांच्या बदल्या झाल्या नसल्याचे, वा त्यांचे नाव वरील संदर्भ २ वरील दि. ८ मार्च, २०१९ च्या शासन निर्णयाच्या परिशिष्ठात समाविष्ठ नसल्याचे निदर्शनास आले आहे. त्यानूसार सर्व संबंधित जिल्हा परिषदांकडून माहिती मागविण्यात आली.

**शासन पूरकपत्र :-**

आता, या आजी सैनिक पत्नींची नावे वरील संदर्भ क्र. २ मधील शासन निर्णयासोबतच्या परिशिष्ठामध्ये समाविष्ठ करण्याचा शासनाने निर्णय घेतला असून, या परिशिष्ठात क्र. २६ नंतर खालील नावे त्यात समाविष्ट करण्यात येत आहेत.

परिशिष्ठ अ

| अ.क्र. | नाव | आडनाव | सद्यस्थितीचा जिल्हा | पंसतीचा जिल्हा | बदली झाली किंवा कसे? | प्रवर्ग |
|---|---|---|---|---|---|---|
| २७ | जयश्री | खांडेकर | पालघर | कोल्हापूर | नाही | -- |
| २८ | शितल | पाचांगणे | रायगड | पुणे | नाही | -- |
| २९ | सुषमा | कदम | रायगड | कोल्हापूर | नाही | -- |
| ३० | शितल | ससे | धुळे | अहमदनगर | नाही | -- |
| ३१ | दिपाली | गुट्टे | अहमदनगर | नांदेड | नाही | -- |
| ३२ | गिता | ढुस | सातारा | पुणे | नाही | -- |
| ३३ | तेजश्री | जाधव | हिंगोली | वाशिम | नाही | -- |
| ३४ | सावित्री | बडेवाड | बुलढाणा | नांदेड | नाही | -- |
| ३५ | अतिना | आवारकर | चंद्रपूर | नागपूर | नाही | -- |
| ३६ | अर्चना | गरमळे | गडचिरोली | चंद्रपूर | नाही | -- |

यासर्व शिक्षकांची त्यांच्या नावासमोर दर्शविलेल्या जिल्हयात तात्काळ बदल्या करण्यात याव्यात. व त्यांना आजच कार्यमुक्त करुन, बदली झालेल्या जिल्हा परिषदेत हजर होण्याचे आदेश देण्यात यावेत. तसेच संबंधितांच्या बदलीबाबत तसेच पदस्थापनेबाबत संदर्भ क्र. २ येथील मुळ शासन निर्णय दि. ८ मार्च, २०१९ मध्ये नमुद केलेल्या अटी व शर्ती कायम आहेत.

सदर शासन पुरकपत्रक महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१९०६१५१८३५०२७४२० असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Priyadarshan S Kamble

Digitally signed by Priyadarshan S Kamble
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Rural Development Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=f18890edb030995db4323c71a3bdecddde94daa5425bbe713b2e2a5b7d6fa779, cn=Priyadarshan S Kamble
Date: 2019.06.15 18:48:07 +05'30'

**( प्रि.शं.कांबळे )**
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत,

१) मा.राज्यपाल महोदय यांचे सचिव, मलबार हिल, मुंबई.
२) मा. मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य यांचे प्रधान सचिव
३) मा.मंत्री/मा.राज्यमंत्री ग्रामविकास, महाराष्ट्र राज्य यांचे खाजगी सचिव
४) मा.विरोधी पक्षनेता, विधानसभा/विधानपरिषद महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई
५) सर्व सन्माननीय विधानसभा सदस्य/विधानपरिषद सदस्य, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई
६) मा. मुख्य सचिव यांचे उपसचिव, मंत्रालय, मुंबई
७) सर्व अपरमुख्य सचिव/प्रधान सचिव/सचिव, सर्व मंत्रालयीन विभाग
८) सर्व विभागीय आयुक्त
९) सर्व मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद
१०) उपायुक्त (आस्थापना) विभागीय आयुक्त कार्यालये (सर्व विभाग)
११) माहिती व जनसंपर्क संचालनालय यांना प्रसिध्दीसाठी अग्रेषित.
१२) सर्व कार्यासने, ग्रामविकास विभाग,
१३) निवड नस्ती कार्या क्र.आस्था-१४, ग्रामविकास विभाग, मुंबई-३२